भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ११९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०३/२०१८

**१) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून व विनयभंग करून जिवे मारण्याची महिलेस धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–**

दिंनाक ०२/०३/२०१८ चे १७.४५ वाजता. दरम्यान यातील आरोपीने दारू निवुन फिर्यादीचे अंगणात येवुन अश्लिल शिवीगाळ करून उजव्या हाताला धरून व मुरगाळुन फिर्यादीचा विनयभंग करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५२,३५४ आ (४) ३२३,५०९,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) घरघुती वादावरून दोन वर्षाच्या मुलीला विहीरीत फेकुन इसमास काठीने मारून जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–**

दिंनाक ०४/०३/२०१८ चे ०८.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी हिने तिचे पती सोबत घरघुती वादावरून रागात येवुन तिने तिची दोन वर्षाची मुलगी नामे याचीका हिला ग्रामपंचायतचे सार्वजनीक विहीरीत फेकुन तसेच तिचा सासरा रामदास सुखाजी बडवाईक हयास बासाचे काठीने नाकावर मारून दुखापत करून जिवे मारण्याचे प्रयत्न केल्याने, जखमी फिर्यादी यांचे बयान व एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३०७,३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. –**

दिंनाक ४/०३/२०१८ चे ११.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी याने त्याचे ताब्यातील स्कुटी क्र. एमएच ३६/ई–३८९६ ही दारू पिवुन ट्रिपल सीट बसवुन विना परवाना स्वतःची गाडी नसतांना चालवीतांना मिळुन आल्याने, त्याची दारू बाबत वैदयकीय तपासनी करून दारू पिल्याचा डॉ. अहवाल प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. उके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १८४,१८५,३/१८०,४/१८०,१२८/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. शेडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) सोन्याचे दागीने व नगदी पैश्याची चोरी. –**

दिंनाक ०३/०३/२०१८ चे १०.३० वाजता. ते ०४/०३/१८ चे ०९.३० दरम्यान यातील फिर्यादी हे बाहेर गावी घराला ताला लावुन गेले असता रात्र दरम्यान कुनीतरी अज्ञात चोराने घराचे समोरील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील बेडरूमध्ये ठेवलेल्या लाकडी आलमारीचा ताला तोडुन त्यात ठेवलेल्या ५ तोळे सोन्याच्या बागंळया, १२ ग्रॅम सोन्याचा गोफ जुना, ६ ग्रॅम सोन्याच्या २ अंगठया व नगदी ४,०००/रु. असा एकुण ८२,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी मधुकर रामचंद्र गिन्हपुंजे वय ४२ वर्ष रा. लक्ष्मी नगर केसलवाडा भंडारा यांचे तोंडी वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) भांडण व शिवीगाळ करून जमीनीवर पाडुन दुखःपत करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . –**

दिंनाक ०४/०३/२०१८ चे २०.०० दरम्यान यातील फिर्यादी मुनेश्वर श्रीपत भोयर वय ३५ वर्ष रा. पिंकेपार हा व आरोपी हे महाल्पे चुलत भाऊ लागतात ते एकाच घरी वेगवेळया खोलीत राहत असुन आरोपी हा दारू पाणी पिवुन फिर्यादीच्या पत्नीला कोणतेही कारण नसतांना शिवीगाळ करीत असतात फिर्यादीने आरोपीला शिवीगाळ करण्यास करण्यास मनाई केल्याने फिर्यादीची बनीयान पकडुन खाली जमीनीवर पाडुन पाठीवर चावुन दुखापत केल्याने, व जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत

६) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु . –

दिनांक ०३/०३/२०१८ चे १४.१५ दरम्यान यातील आरोपी व फिर्यादी हा सिबीझेड मोटार सायकलवर तिन सिट बसवुन सोदेपुर कडुन भोंडकी कडे भरधाव वेगाने, निष्काळजीपणे वाहन चालवित येत असतांना त्याचे वाहना वरील नियंत्रण सुटल्याने नालीत जावुन पडले व सुनिल पारधी हा मरण पावला त्याचे मरणास आरोपी चालक हा कारणीभुत झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. इंगोले यांचे बयान व डॉ. मेमो वरून पो.स्टे. तुमसर ००/१८ कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी. अन्वयेचे कागदपत्र पो.स्टे ला प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाईले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत

७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ४/०३/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील महिंद्रा वाहन हा सुरेवाडा टोली येथे येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. सेलोकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

८) विहीरीचे पाण्यात इसमाचे प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोद. :–

दिंनाक ३/०३/२०१८ चे १९.०० वाजता पुर्वी यातील फिर्यादी त्याचे शेतात काडया गोळा करण्यास गेला असता, त्याचे शेतातील विहीरीचे पाण्यात यातील मृतक कांताप्रसाद उर्फ पैकु सदाशिव कालेकार वय ३५ वर्ष रा. गोवारीटोला देवनाळा हा विहीरीचे पाण्यात बुडुन मरण पावल्याचे दिसल्याने, फिर्यादी रोशन ताराचंद हातझोडे वय ४२ वर्ष रा. गोबरवाही यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाईले पोलीस स्टेशन गोबरवाही करीत आहेत.

९) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–

दिनांक ०४/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, लाखनी, व पालांदुर येथे अवैध दारु अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५ लिटर हातभट्टी दारू + ४८० किलो सडवा मोहा + साहीत्य किंमती १३,९२०/–रु. व ८ लिटर ६४० मिलीलीटर देशी दारू किंमती २,८८०/–रु. असा एकुण १६,८००/रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०४/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी किंमती ०२ तीन सिटर वाहनाकरीता ३ ईतर वाहनांवरती – ७९ केसेस करण्यात आले आहे.

05.3

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.